

# ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’तर्फे मधमाशी पालनाविषयी वेबिनार



## मधमाशी पालनातून स्वयंरोजगार

‘ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.’ संचलित ‘बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा’च्या वतीने, दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी मधमाशी पालनाविषयी वेबिनारचे आयोजन करण्यात येते. ऑगस्ट महिन्यातील पहिल्या बुधवारी म्हणजेच ५ ऑगस्ट २०२० रोजी ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’चे टेक्निकल डायरेक्टर तथा ‘पूर्वा कृषिदूत’ मासिकाचे संपादक डॉ.श्री. भास्कर गायकवाड, ‘बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्रा’चे व्यवस्थापक श्री. नितीन कराळे, ग्रीनझोन ॲग्रोकेमचे प्रॉडक्शन एक्झिक्युटिव्ह श्री. शुभम वाघ या तज्ज्ञांनी मधमाशी पालन आणि त्यापासून मिळणारे विविध पदार्थ या विषयावर मार्गदर्शन केले.

पहिल्या सत्रामध्ये डॉ. भास्कर गायकवाड यांनी मधमाशी पालनातून मिळणाऱ्या अनेक पदार्थांमधील विविध गुणधर्मांचा तपशील देऊन, हे पदार्थ मानवी आरोग्याला कसे उपयुक्त आहेत याबद्दल माहिती दिली. तसेच या माध्यमातून स्वयंरोजगार निर्मितीच्या कशा संधी आहेत, याबद्दल सविस्तर विवेचन केले.

श्री. नितीन कराळे यांनी मधमाशी पालनातून विविध पदार्थांची निर्मिती करण्याच्या पद्धतींबद्दल मार्गदर्शन केले. विशेषत: या पदार्थांची निर्मिती करताना घ्यावयाची काळजी तसेच किती उत्पादन मिळते याबद्दल माहितीही दिली.

श्री. शुभम वाघ यांनी मधमाशी पालनातून मिळणाऱ्या विविध पदार्थांची गुणवत्ता, प्रमाणीकरण याबद्दल विवेचन केले. विशेषत: मधाची गुणप्रत आणि गुणवत्ता घरच्या घरी तपासण्यासाठीच्या सोप्या पद्धतींची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, स्वागत आणि आभार प्रदर्शन ‘पूर्वा केमटेक प्रा.लि.’च्या मानव संसाधन विभागाचे श्री. रुपेश ठाकरे यांनी केले.

## मधु-उद्योजकांच्या यशोगाथा

ऑगस्ट महिन्याचा दुसरा वेबिनार १९ ऑगस्ट २०२० रोजी संपन्न झाला. या वेबिनारमध्ये ‘मधमाशी पालनातील यशोगाथा’ या विषयावरील कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मधमाशी पालनामध्ये यशस्वी झालेल्या उद्योजकांना यामध्ये सहभागी करून घेण्यात आले. यशोगाथांच्या संदर्भातल्या या पहिल्याच उपक्रमामध्ये अहमदनगरचे श्री. नानासाहेब इंगळे, जळगावचे श्री. विष्णू जंगले आणि नाशिकचे श्री. सचिन उगले यांना निमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’चे टेक्निकल डायरेक्टर डॉ. भास्कर गायकवाड यांनी प्रास्ताविकाद्वारे सर्व तज्ज्ञांची ओळख करून दिली तसेच या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली.

श्री. नानासाहेब इंगळे हे परागीभवनासाठी मधमाशीच्या पेट्या भाड्याने देतात. त्यांनी आपले अनुभव, अडचणी तसेच भविष्यातील संधी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. श्री. विष्णू जंगले यांच्याकडे ४०० ते ५०० मधमाश्यांच्या पेट्या आहेत. ते मधाच्या उत्पादनासाठी मधमाशी पालन करतात आणि त्यासाठी उत्तर भारतातील राज्यांचा प्रवास करतात. आपले अनुभव त्यांनी सांगितले. श्री. सचिन उगले हे सुद्धा मध उत्पादनासाठी उत्तर प्रदेश तसेच महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये मधमाश्यांच्या वसाहती घेऊन फिरतात. याबद्दल बोलताना मधमाशी पालन व्यवसायात महाराष्ट्रात येणाऱ्या अडचणी तसेच संधी याबद्दल त्यांनी अनुभव कथन केले. या तीनही उद्योजकांच्या मार्गदर्शनानंतर डॉ. भास्कर गायकवाड यांनी या व्यावसायिकांची सविस्तर मुलाखत घेऊन श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. दोनही वेबिनारला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तसेच भविष्यात हे उपक्रम शहरी भागातील व्यावसायिकांसाठी सुद्धा आयोजित करावेत, अशा प्रकारची मागणी सहभागींद्वारे करण्यात आली. ■